का. प्र.

भारत सरकार

विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# कंत्राटी कामगार सेवा (विनियमन व उच्चाटन) अधिनियम, १९७०

( १९७० चा अधिनियम क्रमांक ३७. )

(१ नोव्हेंबर १९७७ रोजी अंमलात असल्याप्रमाणे)

# The Contract Labour (Regulation And Abolition) Act, 1970

( Act No. 37 of 1970 )

( As in force on 1st November, 1977)

संचालक, मुद्रण व लेखन सामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.

(१९७८)

किंमत ५० पैसे

# कंत्राटी कामगार सेवा (विनियमन व उच्चाटन) अधिनियम, १९७०

## कलमांचा क्रम

कलमे


### प्रकरण १ ले

#### प्रारंभिक

१. संक्षिप्त नाव, विस्तार, प्रारंभ आणि प्रयुक्ती.
२. व्याख्या.

### प्रकरण २ रे

#### सल्लागार मंडळे

३. केंद्रीय सल्लागार मंडळ.
४. राज्य सल्लागार मंडळ.
५. समित्या घटित करण्याची शक्ती.

### प्रकरण ३ रे

#### कंत्राटी कामगारांना कामाला लावणाऱ्या आस्थापनांची नोंदणी

६. नोंदणी अधिकाऱ्यांची नियुक्ती.
७. विवक्षित आस्थापनांची नोंदणी.
८. विवक्षित प्रकरणी नोंदणी प्रत्याहृत करणे.
९. नोंदणी न केल्याचा परिणाम.
१०. कंत्राटी कामगारांना कामाला लावण्यास मनाई.

### प्रकरण ४ थे

#### कंत्राटदारांना लायसने देणे

११. लायसन अधिकाऱ्यांची नियुक्ती.
१२. कंत्राटदारांना लायसने देणे.
१३. लायसने मंजूर करणे.
१४. लायसनांचे प्रत्याहरण, निलंबन व विशोधन.
१५. अपील.

### प्रकरण ५ वे

#### कंत्राटी कामगारांचे कल्याण व आरोग्य

१६. आहारगृहे.
१७. विश्रांतिकक्ष.
१८. अन्य सुविधा.
१९. प्रथमोपचाराच्या सुविधा.
२०. विवक्षित बाबतीत मुख्य नियोक्त्याचे दायित्व.
२१. वेतन देण्याची जबाबदारी.

## प्रकरण ६ वे

### दंड आणि प्रक्रिया

**कलमे**

२२. अटकाव.
२३. कंत्राटी कामगारांना कामाला लावण्यासंबंधीच्या उपबंधांचे व्यतिक्रमण.
२४. अन्य गुन्हे.
२५. कंपन्यांनी केलेले गुन्हे.
२६. गुन्ह्यांची दखल घेणे.
२७. अभियोगांची मुदत.

## प्रकरण ७ वे

### संकीर्ण

२८. निरीक्षण कार्य करणारा कर्मचारीवर्ग.
२९. नोंदवह्या आणि अन्य अभिलेख ठेवावयाचे.
३०. या अधिनियमाशी विसंगत असलेल्या कायद्यांची व करारांची परिणामकता.
३१. विशेष प्रकरणात सूट देण्याची शक्ती.
३२. या अधिनियमाखाली केलेल्या कारवाईस संरक्षण.
३३. निदेश देण्याची शक्ती.
३४. अडचणी निवारण करण्याची शक्ती.
३५. नियम करण्याची शक्ती.

# कंत्राटी कामगारसेवा (विनियमन व उच्चाटन) अधिनियम, १९७०

## (१९७० चा अधिनियम क्रमांक ३७)

[५ सप्टेंबर, १९७०]

विवक्षित आस्थापनांमधील कंत्राटी कामगारांचे सेवायोजन विनियमित करण्यासाठी आणि विवक्षित परिस्थितीत त्याचे उच्चाटन करण्याचा व तत्संबंधित बाबींचा उपबंध करण्यासाठी अधिनियम.

भारतीय गणराज्याच्या एकविसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

### प्रकरण १ ले

### प्रारंभिक

१. (१) या अधिनियमास 'कंत्राटी कामगारसेवा (विनियमन व उच्चाटन) अधिनियम, १९७०' असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव, विस्तार, प्रारंभ आणि प्रयुक्ती.

(२) त्याचा विस्तार संपूर्ण भारतभर आहे.

(३) केंद्र शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेव्दारे नियत करील अशा दिनांकास[1] तो अंमलात येईल व या अधिनियमाच्या निरनिराळ्या उपबंधांसाठी निरनिराळे दिनांक नियत करता येतील.

(४) तो—

(क) ज्या आस्थापनेमध्ये वीस किंवा त्याहून अधिक कामगार कंत्राटी कामगार म्हणून कामाला असतील किंवा मागील बारा महिन्यांतील कोणत्याही दिवशी कामाला होते अशा प्रत्येक आस्थापनेला ;

(ख) जो कंत्राटदार वीस किंवा अधिक कामगार कामाला ठेवतो किंवा ज्याने मागील बारा महिन्यांतील कोणत्याही दिवशी कामाला ठेवले होते अशा प्रत्येक कंत्राटदाराला लागू होतो :

परंतु वीसपेक्षा कमी कामगार कामाला ठेवणाऱ्या कोणत्याही आस्थापनेला किंवा कंत्राटदाराला या अधिनियमाचे उपबंध लागू करण्याचा आपला उद्देश असल्याबाबत किमान दोन महिन्यांची नोटीस दिल्यानंतर समुचित शासनाला शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे ते उपबंध अधिसूचनेमध्ये ती कामगारसंख्या विनिर्दिष्ट करून त्याप्रमाणे लागू करता येतील.

(५) (क) ज्या आस्थापनांमध्ये अधूनमधून किंवा निमित्तवशात् करावे लागणारे अशाच स्वरूपाचे काम केले जाते त्यांना तो लागू होणार नाही.

(ख) एखाद्या आस्थापनेमध्ये केले जाणारे काम हे अधूनमधून किंवा निमित्तवशात् करावे लागणारे अशा स्वरूपाचे आहे किंवा काय असा जर प्रश्न उद्‌भवला तर, समुचित शासन केंद्रीय मंडळाशी किंवा, प्रकरणपरत्वे, राज्य मंडळाशी विचारविनिमय करून नंतर त्या प्रश्नाचा निर्णय करील व त्याचा निर्णय अंतिम असेल.

**स्पष्टीकरण** :—या पोटकलमाच्या प्रयोजनार्थ, एखाद्या आस्थापनेमध्ये केले जाणारे काम हे,—

(एक) जर मागील बारा महिन्यांत एकशेवीस दिवसांपेक्षा अधिक दिवस केलेले असेल, किंवा

(दोन) जर हंगामी स्वरूपाचे असून एका वर्षामध्ये साठ दिवसांपेक्षा अधिक दिवस केलेले असेल,

तर ते अधूनमधून करावे लागणारे अशा स्वरूपाचे काम मानण्यात येणार नाही.

२. (१) या अधिनियमात, संदर्भामुळे अन्यथा आवश्यक नसेल तर,— व्याख्या.

(क) "समुचित शासन" याला—

(१) (एक) केंद्र शासनाच्या प्राधिकाराअन्वये किंवा त्याखाली चालवलेल्या कोणत्याही उद्योगाशी संबंधित असणारी किंवा केंद्र शासन याबाबतीत विनिर्दिष्ट करील अशा कोणत्याही नियंत्रित उद्योगाशी संबंधित असणारी कोणतीही आस्थापना, किंवा

(दोन) कोणतीही रेल्वे, कटक मंडळ, मोठे बंदर, खाण किंवा तेल-क्षेत्र यांची कोणतीही आस्थापना, किंवा

(तीन) बँकव्यवसायी किंवा विमाव्यवसायी कंपनीची कोणतीही आस्थापना,

यांच्या संबंधात केंद्र शासन असा अर्थ आहे,

(२) अन्य कोणत्याही आस्थापनेच्या संबंधात, ज्या राज्यामध्ये ती अन्य आस्थापना आहे ते राज्य शासन असा अर्थ आहे ;

---

[1] १० फेब्रुवारी १९७१, पहा, जी. एस्. आर्. १९०, दिनांक १ फेब्रुवारी १९७१, गॅझेट ऑफ इंडिया असाधारण–भाग दोन–उपविभाग ३ (एक), पृ. १७३.

(ख्) जेव्हा कामगार हा आस्थापनेच्या कामामध्ये किंवा अशा कामाच्या संबंधात मुख्य नियोक्त्याला माहीत असताना किंवा नसताना कंत्राटदाराकडून किंवा त्याच्यामार्फत मजुरीवर कामाला ठेवलेला असेल तेव्हा, तो अशा कामामध्ये किंवा त्याच्या संबंधात "कंत्राटी कामगार" म्हणून कामाला असल्याचे मानण्यात येईल;

(ग्) "कंत्राटदार" याचा आस्थापनेच्या संबंधातील अर्थ, जी व्यक्ती अशा आस्थापनेला माल किंवा बनवलेल्या वस्तू यांचा नुसता पुरवठा करण्याचे काम खेरीजकरून, आस्थापनेसाठी कंत्राटी कामगाराच्या मार्फत ठराविक फलनिष्पत्ती करण्याचे काम अंगावर घेते अथवा जी आस्थापनेच्या कोणत्याही कामासाठी कंत्राटी कामगार पुरवते ती व्यक्ती, असा आहे व त्यात उप कंत्राटदाराचा समावेश होतो ;

(घ्) "नियंत्रित उद्योग" याचा अर्थ, ज्या कोणत्याही उद्योगाचे संघराज्याकडून नियंत्रण होणे हे सार्वजनिक हिताच्या दृष्टीने इष्ट असल्याचे कोणत्याही केंद्रीय अधिनियमाद्वारे घोषित करण्यात आले आहे तो उद्योग, असा आहे ;

(ङ्) "आस्थापना" याचा अर्थ —

(एक) शासनाचे किंवा स्थानिक प्राधिकारणाचे कोणतेही कार्यालय किंवा विभाग, किंवा

(दोन) जेथे कोणताही उद्योग, उदीम, धंदा, निर्मिती किंवा व्यवसाय चालवला जातो अशी कोणतीही जागा,

असा आहे;

(च्) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले असा आहे;

(छ्) "मुख्य नियोक्ता" याला,—

(एक) शासनाच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या कोणत्याही कार्यालयाच्या किंवा विभागाच्या संबंधात, त्या कार्यालयाचा किंवा विभागाचा प्रमुख अथवा शासनाकडून किंवा, प्रकरणपरत्वे, स्थानिक प्राधिकरणाकडून याबाबतीत विनिर्दिष्ट करण्यात येईल असा अन्य अधिकारी;

(दोन) कारखान्यामध्ये, कारखान्याचा मालक किंवा कार्यचालक आणि जेव्हा 'कारखाने अधिनियम, १९४८' खाली एखादी व्यक्ती कारखान्याचा व्यवस्थापक म्हणून नामनिर्दिष्ट केली गेली असेल तेव्हा अशी नामनिर्दिष्ट केलेली व्यक्ती;

(तीन) खाणीमध्ये, खाणीचा मालक किंवा एजंट आणि जेव्हा एखादी व्यक्ती खाणीचा व्यवस्थापक म्हणून नामनिर्दिष्ट केली गेली असेल तेव्हा अशी नामनिर्दिष्ट केलेली व्यक्ती ;

(चार) अन्य कोणत्याही आस्थापनेमध्ये, आस्थापनेचे पर्यवेक्षण व नियंत्रण यांसाठी जबाबदार असलेली कोणतीही व्यक्ती,

असा अर्थ आहे.

**स्पष्टीकरण :**—या खंडातील उप-खंड (तीन) च्या प्रयोजनार्थ "खाण", "मालक" आणि "एजंट" या शब्दप्रयोगांना 'खाणी अधिनियम, १९५२' (१९५२ चा ३५), कलम २ पोटकलम (१)चे अनुक्रमे खंड (ञ्), खंड (ठ्) आणि खंड (ग्) यांमध्ये नेमून दिल्याप्रमाणे ते ते अर्थ असतील;

(ज्) "वेतन" याला, 'वेतन प्रदान अधिनियम, १९३६' (१९३६ चा ४), कलम २-खंड (६) मध्ये त्याला नेमून दिलेला अर्थ असेल;

(झ्) "कामगार" याचा अर्थ, कोणत्याही आस्थापनेच्या कामामध्ये किंवा त्या कामाच्या संबंधात कोणतेही कुशल, अर्धकुशल किंवा अकुशल, अंगमेहनतीचे, पर्यवेक्षकीय, तंत्रकुशल किंवा कारकुनी काम करण्यासाठी मोलाने किंवा इनामाच्या मोबदल्यात कामाला लावलेली कोणतीही व्यक्ती असा आहे—मग सेवायोजनाच्या अटी व्यक्त असोत किंवा उपलक्षित असोत—पण पुढे दिलेल्या अशा कोणत्याही व्यक्तींचा यात समावेश नाही :—

(क) जी व्यक्ती मुख्यत्वेकरून व्यवस्थापकीय किंवा प्रशासकीय हुद्यावर नेमलेली आहे; किंवा

(ख) जी व्यक्ती पर्यवेक्षकीय हुद्यावर नेमलेली असून, दरमहा पाचशे रुपयांपेक्षा जास्त वेतन मिळवते अथवा त्या पदाशी संलग्न असलेल्या कामाच्या स्वरूपामुळे किंवा तिच्या ठायी निहित असलेल्या शक्तींमुळे जी मुख्यत्वेकरून व्यवस्थापकीय स्वरूपाचीच कार्ये बजावते; किंवा

(ग) जी व्यक्ती बाहेरचा कामगार आहे म्हणजे, जेव्हा एखाद्या व्यक्तीला दुसऱ्या व्यक्तीने अशी दुसऱ्या व्यक्तीच्या उदीमासाठी किंवा धंद्यासाठी कोणत्याही वस्तू किंवा कोणतेही साहित्य विक्रीच्या दृष्टीने तयार करण्यासाठी, साफ करण्यासाठी, धुण्यासाठी, त्यात बदल करण्यासाठी, ते सुशोभवण्यासाठी, शवटचा हात फिरवण्यासाठी, दुरुस्त करण्यासाठी, अनुकूल बदल करून घेण्यासाठी किंवा अन्य प्रकारे प्रक्रिया करण्यासाठी दिलेले असून, ती प्रक्रिया त्या बाहेरच्या कामगाराच्या घरी अथवा जी वास्तू त्या दुसऱ्या व्यक्तीच्या नियंत्रणाखाली व व्यवस्थापनाखाली नाही अशा अन्य एखाद्या वास्तूमध्ये करावयाची असेल तेव्हा, ती पूर्वोक्त व्यक्ती.

(२) जम्मू व काश्मीर राज्यामध्ये जो कायदा अंमलात नाही त्या कायद्याच्या या अधिनियमातील कोणत्याही उल्लेखाचा अर्थ, त्या राज्याच्या संबंधात, त्या राज्यात कोणताही समनुरूप कायदा अंमलात असल्यास त्याचा उल्लेख म्हणून लावला जाईल.

## प्रकरण २ रे

### सल्लागार मंडळे

३. (१) केंद्र शासन, होईल तितक्या लवकर, 'कंत्राटी कामगारसेवाविषयक केंद्रीय सल्लागार मंडळ' या नावाचे एक मंडळ (यात यापुढे 'केंद्रीय मंडळ' म्हणून निर्देशिलेले) या अधिनियमाच्या अंमलबजावणीमधून उद्‌भवणाऱ्या ज्या बाबी त्याच्याकडे निर्देशित करण्यात येतील अशा बाबींवर केंद्र शासनाला सल्ला देण्यासाठी आणि या अधिनियमाखाली त्या मंडळाला नेमून दिलेली अन्य कार्ये पार पाडण्यासाठी घटित करील. केंद्रीय सल्लागार मंडळ.

(२) केंद्रीय मंडळ पुढील व्यक्ती मिळून बनलेले असेल :—

(क्) केंद्र शासनाने नियुक्त करावयाचा अध्यक्ष ;

(ख्) मुख्य कामगार आयुक्त, पदसिद्ध ;

(ग्) केंद्र शासन, रेल्वे, कोळसा उद्योग, खाणकाम उद्योग, कंत्राटदार, कामगार आणि केंद्र शासनाच्या मते ज्यांना केंद्रीय मंडळावर प्रतिनिधित्व मिळावयास हवे असे अन्य कोणतेही हितसंबंधित यांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी ते शासन नामनिर्दिष्ट करील असे सतरापेक्षा जास्त नाहीत, पण अकराहून कमी नव्हेत इतके सदस्य.

(३) पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या संवर्गांपैकी प्रत्येकामधून केंद्रीय मंडळाचे सदस्य म्हणून नियुक्त करावयाच्या व्यक्तींची संख्या, त्या सदस्यांचा पदावधी व अन्य सेवा-शर्ती, त्यांनी आपली कार्ये पार पाडताना अनुसरावयाची कार्यपद्धती, आणि त्यांच्यामधील रिक्त पदे भरावयाची रीत हे विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल :

परंतु, कामगारांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी नामनिर्दिष्ट केलेल्या सदस्यांची संख्या ही, मुख्य नियोक्ते व कंत्राटदार यांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी नामनिर्दिष्ट केलेल्या सदस्यांच्या संख्येहून कमी असणार नाही.

४. (१) राज्य शासनाला 'कंत्राटी कामगारसेवाविषयक राज्य सल्लागार मंडळ' या नावाचे एक मंडळ (यात यापुढे 'राज्य मंडळ' म्हणून निर्देशिलेले) या अधिनियमाच्या अंमलबजावणीमधून उद्‌भवणाऱ्या ज्या बाबी त्याच्याकडे निर्देशित करण्यात येतील अशा बाबींवर राज्य शासनाला सल्ला देण्यासाठी आणि या अधिनियमाखाली मंडळाला नेमून दिलेली अन्य कार्ये पार पाडण्यासाठी घटित करता येईल. राज्य सल्लागार मंडळ.

(२) राज्य मंडळ पुढील व्यक्तींचे मिळून बनलेले असेल :—

(क्) राज्य शासनाने नियुक्त करावयाचा अध्यक्ष ;

(ख्) कामगार आयुक्त, पदसिद्ध, किंवा त्याच्या अनुपस्थितीत याबाबतीत राज्य शासनाने नामनिर्दिष्ट केलेला अन्य कोणताही अधिकारी;

(ग्) राज्य शासन, उद्योग, कंत्राटदार, कामगार आणि राज्य शासनाच्या मते ज्यांना राज्य मंडळावर प्रतिनिधित्व मिळावयास हवे असे अन्य कोणतेही हितसंबंधित यांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी ते शासन नामनिर्दिष्ट करील असे अकरापेक्षा जास्त नाहीत, पण नवाहून कमी नव्हेत इतके सदस्य.

(३) पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या संवर्गांपैकी प्रत्येकामधून राज्य मंडळाचे सदस्य म्हणून नियुक्त करावयाच्या व्यक्तींची संख्या, त्या सदस्यांचा पदावधी व अन्य सेवा-शर्ती, त्यांनी आपली कार्ये पार पाडताना अनुसरावयाची कार्यपद्धती, आणि त्यांच्यामधील रिक्त पदे भरावयाची रीत हे विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल :

परंतु, कामगारांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी नामनिर्दिष्ट केलेल्या सदस्यांची संख्या ही, मुख्य नियोक्ते व कंत्राटदार यांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी नामनिर्दिष्ट केलेल्या सदस्यांच्या संख्येहून कमी असणार नाही.

५. (१) केंद्रीय मंडळाला किंवा, प्रकरणपरत्वे, राज्य मंडळाला, स्वतःला योग्य वाटतील अशा प्रयोजनासाठी किंवा प्रयोजनांसाठी तशा समित्या घटित करता येतील. समित्या घटित करण्याची शक्ती.

(२) पोटकलम (१) खाली घटित केलेली समिती विहित करण्यात येईल त्याप्रमाणे अशा वेळी आणि ठिकाणी सभा भरवील आणि तिच्या सभांच्या वेळी कामकाज चालवण्याच्या बाबतीत तशा विहित केलेल्या कार्यपद्धति-नियमांचे पालन करील.

(३) समितीच्या सदस्यांना सभांना उपस्थित राहण्याबद्दल विहित करण्यात येईल त्याप्रमाणे फी व भत्ते दिले जातील :

परंतु, जो सदस्य शासकीय किंवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या कायद्याद्वारे स्थापन केलेल्या कोणत्याही महामंडळाचा अधिकारी असेल तर, त्याला काहीही फी दिली जाणार नाही.

एच ४८३१—२ (१०५५–५-७८)

## प्रकरण ३ रे

### कंत्राटी कामगारांना कामाला लावणाऱ्या आस्थापनांची नोंदणी

नोंदणी अधिकाऱ्यांची नियुक्ती.

६. समुचित शासनाला, **शासकीय राजपत्रात** अधिसूचित केलेल्या आदेशाद्वारे —

(क्) शासनाचे राजपत्रित अधिकारी असलेल्या ज्या व्यक्ती त्याला या प्रकरणाच्या प्रयोजनार्थ नोंदणी अधिकारी म्हणून योग्य वाटतील त्यांची नियुक्ती करता येईल; आणि

(ख्) या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली नोंदणी अधिकाऱ्याला प्रदान केलेल्या शक्ती त्या अधिकाऱ्याला ज्या सीमांमध्ये वापराव्या लागतील त्या सीमा निश्चित करता येतील.

विवक्षित आस्थापनांची नोंदणी.

७. (१) हा अधिनियम ज्या आस्थापनेला लागू होतो त्या आस्थापनेचा नियोक्ता असलेली प्रत्येक व्यक्ती, आस्थापनांच्या बाबत सरसकट किंवा त्यांपैकी कोणत्याही वर्गाच्या बाबत समुचित शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे यासंबंधात निश्चित करील अशा कालावधीच्या आत, त्या आस्थापनेच्या नोंदणीसाठी विहित नमुन्यात नोंदणी अधिकाऱ्याकडे अर्ज करील :

परंतु, जर पुरेशा कारणामुळे अर्जदाराला वेळीच अर्ज करता आला नाही याबाबत नोंदणी अधिकाऱ्याची खात्री पटली तर, याबाबतीत निश्चित केलेला कालावधी संपल्यानंतरही नोंदणीसाठी आलेला कोणताही अर्ज नोंदणी अधिकाऱ्याला विचारार्थ स्वीकारता येईल.

(२) नोंदणीसाठी केलेला अर्ज जर सर्व बाबतीत परिपूर्ण असेल तर, नोंदणी अधिकारी आस्थापनेची नोंदणी करील आणि विहित करण्यात येईल असा तपशील अंतर्भूत असलेले नोंदणी प्रमाणपत्र आस्थापनेच्या मुख्य नियोक्त्याला देईल.

विवक्षित प्रकरणी नोंदणी प्रत्याहृत करणे.

८. एखाद्या आस्थापनेची नोंदणी अपवेदनाद्वारे किंवा महत्त्वपूर्ण वस्तुस्थिती दडपून ठेवून घडवून आणलेली आहे अथवा अन्य कोणत्याही कारणास्तव नोंदणी निरुपयोगी किंवा परिणामशून्य झालेली आहे आणि म्हणून ती प्रत्याहृत करणे आवश्यक आहे याबाबत जर, नोंदणी अधिकाऱ्याकडे करण्यात आलेल्या निदशनावरून किंवा अन्यथा त्याची खात्री पटली तर, आस्थापनेच्या मुख्य नियोक्त्याला आपले म्हणणे मांडण्याची संधी देऊन आणि समुचित शासनाची पूर्वमंजुरी घेऊन नंतर नोंदणी अधिकाऱ्याला नोंदणी प्रत्याहृत करता येईल.

नोंदणी न केल्याचा परिणाम.

९. ज्या आस्थापनेला हा अधिनियम लागू होतो अशा आस्थापनेचा मुख्य नियोक्ता असलेला कोणीही —

(क्) ज्या आस्थापनेची कलम ७ खाली नोंदणी करणे आवश्यक आहे पण त्या कलमाखाली या प्रयोजनासाठी निश्चित केलेल्या कालावधीमध्ये नोंदणी करण्यात आलेली नाही तिच्याबाबतीत,

(ख्) ज्या आस्थापनेच्या बाबतीत कलम ८ खाली नोंदणी प्रत्याहृत करण्यात आलेली आहे तिच्या बाबतीत,

खंड (क्) मध्ये निर्देशित केलेला कालावधी संपल्यानंतर किंवा, प्रकरणपरत्वे, खंड (ख्) मध्ये निर्देशित केलेली नोंदणी प्रत्याहृत झाल्यानंतर त्या आस्थापनेत कंत्राटी कामगार कामाला लावणार नाही.

कंत्राटी कामगारांना कामाला लावण्यास मनाई.

१०. (१) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, समुचित शासनाला केंद्रीय मंडळाशी किंवा, प्रकरणपरत्वे, राज्य मंडळाशी विचारविनिमय करून नंतर शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, कोणत्याही आस्थापनेमध्ये, कोणत्याही प्रक्रियेमध्ये, क्रियेमध्ये किंवा अन्य कामामध्ये कंत्राटी कामगार कामाला लावणे मना करता येईल.

(२) एखाद्या आस्थापनेच्या संबंधात पोटकलम (१) खाली कोणतीही अधिसूचना काढण्यापूर्वी, समुचित शासन, त्या आस्थापनेमध्ये कंत्राटी कामगारांसाठी उपलब्ध करून दिलेली कामाची परिस्थिती व लाभ आणि पुढे नमूद केले आहेत तशासारखे इतर संबद्ध घटक विचारात घेईल :—

(क्) ती प्रक्रिया, क्रिया किंवा अन्य काम हे, आस्थापनेमध्ये चालवला जाणारा उद्योग, उदीम, धंदा, निर्मिती किंवा व्यवसाय याला आनुषंगिक किंवा आवश्यक आहे किंवा काय;

(ख्) ते काम बारमाही स्वरूपाचे म्हणजे, आस्थापनेमध्ये चालवला जाणारा उद्योग, उदीम, धंदा, निर्मिती किंवा व्यवसाय यांच्या स्वरूपाचा विचार करता ते पुरेसा काळ चालणारे आहे किंवा काय;

(ग्) ते काम त्या आस्थापनेमध्ये किंवा तत्सम आस्थापनेमध्ये सर्वसामान्यपणे नेहमीच्या कामगारांमार्फत केले जाते किंवा काय;

(घ्) ते काम बऱ्याचशा पूर्ण वेळ कामगारांना कामाला लावण्याइतपत पुरेसे आहे किंवा काय.

**स्पष्टीकरण**:—एखादी प्रक्रिया, क्रिया किंवा अन्य काम हे बारमाही स्वरूपाचे आहे किंवा काय असा प्रश्न उद्‌भवला तर, समुचित शासनाचा त्यावरील निर्णय अंतिम असेल.

## प्रकरण ४ थे

### कंत्राटदारांना लायसने देणे

**११.** समुचित शासनाला, **शासकीय राजपत्रात** अधिसूचित केलेल्या आदेशाद्वारे,— लायसन अधिकाऱ्यांची नियुक्ती.

(क्) शासनाचे राजपत्रित अधिकारी असलेल्या ज्या व्यक्ती त्याला या प्रकरणाच्या प्रयोजनार्थ लायसन अधिकारी म्हणून योग्य वाटतील अशा व्यक्तींची नियुक्ती करता येईल; आणि

(ख्) या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली लायसन अधिकाऱ्याला प्रदान केलेल्या शक्ती त्या अधिकाऱ्याला ज्या सीमांमध्ये वापराव्या लागतील त्या निश्चित करता येतील.

१२. (१) ज्याला हा अधिनियम लागू होतो असा कोणताही कंत्राटदार, समुचित शासनाकडून शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियत करण्यात येईल अशा दिनांकापासून कोणतेही काम, त्याबाबतीत लायसन अधिकाऱ्याने लायसन दिले असल्याखेरीज व त्याला अनुसरल्याखेरीज एरव्ही, कंत्राटी कामगारांच्या मार्फत करवण्याची जबाबदारी पत्करणार नाही किंवा त्यांच्यामार्फत करवून घेणार नाही. कंत्राटदारांना लायसने देणे.

(२) या अधिनियमाच्या उपबंधांच्या अधीनतेने, पोटकलम (१) खालील लायसनामध्ये, विशेषतः कंत्राटी कामगारांचे कामाचे तास, वेतनाची निश्चिती आणि अन्य अत्यावश्यक सुखसोयी यांबाबतच्या शर्ती धरून, समुचित शासनाला कलम ३५ खाली काही नियम केले असल्यास त्यांनुसार ज्या शर्ती लादणे योग्य वाटेल अशा शर्ती अंतर्भूत असतील, आणि विहित करण्यात येईल अशी फी भरण्यात आल्यावर व शर्तींचे योग्य प्रकारे पालन होण्याबद्दल प्रतिभूती म्हणून काही रक्कम विहित केली असल्यास ती अनामत ठेवण्यात आल्यावर, ते लायसन देण्यात येईल.

**१३.** (१) कलम १२ चे पोटकलम (१) याखाली लायसनाच्या मंजुरीसाठी करावयाचा प्रत्येक अर्ज विहित नमुन्यात करण्यात येईल आणि त्यामध्ये आस्थापनेचे ठिकाण, ज्यासाठी कंत्राटी कामगार कामावर लावावयाचे त्या प्रक्रियेचे, क्रियेचे किंवा कामाचे स्वरूप यासंबंधीचा तपशील आणि विहित करण्यात येईल असा अन्य तपशील अंतर्भूत असेल. लायसने मंजूर करणे.

(२) विहित करण्यात येईल त्याप्रमाणे लायसन अधिकाऱ्याला पोटकलम (१) खाली आलेल्या अर्जाच्या बाबतीत बारकाईने चौकशी करता येईल आणि अशी कोणतीही चौकशी करताना लायसन अधिकारी तशी विहित कार्यपद्धती अनुसरील.

(३) या प्रकरणाखाली मंजूर केलेले लायसन त्यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीपर्यंत विधिग्राह्य असेल आणि विहित करण्यात येईल अशा कालावधीसाठी, तशी विहित फी देण्यात आल्यानंतर आणि तशा विहित शर्तींवर त्याचे वेळोवेळी नवीकरण करता येईल.

**१४.** (१) (क्) कलम १२ खाली मंजूर केलेले लायसन हे अपवेदनाद्वारे किंवा महत्त्वपूर्ण वस्तुस्थिती दडपून ठेवून मिळवण्यात आलेले आहे, किंवा लायसनांचे प्रत्याहरण, **निलंबन व** विशोधन.

(ख्) लायसनधारक हा, ज्या शर्तींवर लायसन मंजूर केले गेले त्यांचे अनुपालन करण्यास वाजवी कारणाशिवाय चुकलेला आहे अथवा त्याने या अधिनियमाच्या उपबंधांचे किंवा त्याखाली केलेल्या नियमांचे व्यतिक्रमण केलेले आहे,

अशी जर लायसन अधिकाऱ्याकडे करण्यात आलेल्या निर्देशनावरून किंवा अन्यथा त्याची खात्री पटली तर, लायसनधारक या अधिनियमाखाली ज्या अन्य कोणत्याही दंडास पात्र असेल त्याला बाध न येता, लायसन अधिकारी, लायसनधारकाला कारण दाखवण्याची संधी देऊन नंतर लायसन प्रत्याहृत करू शकेल किंवा निलंबित करू शकेल किंवा ज्या शर्तींवर लायसन मंजूर केले गेले होते त्यांचे योग्य प्रकारे पालन होण्याबद्दल प्रतिभूती म्हणून काही रक्कम अनामत ठेवलेली असल्यास ती रक्कम किंवा तिचा काही अंश जप्त करू शकेल.

(२) याबाबतीत करण्यात येतील त्या कोणत्याही नियमांच्या अधीनतेने, कलम १२ खाली मंजूर केलेल्या लायसनामध्ये लायसन अधिकाऱ्याला बदल करता येईल किंवा विशोधन करता येईल.

**१५.** (१) कलम ७, कलम ८, कलम १२ किंवा कलम १४ याखाली काढलेल्या आदेशामुळे नाराज झालेल्या कोणत्याही व्यक्तीला, तो आदेश तिला कळवण्यात आल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत अपील अधिकाऱ्याकडे अपील दाखल करता येईल—तो अधिकारी म्हणजे समुचित शासनाने याबाबतीत नामनिर्दिष्ट केलेली व्यक्ती असेल: अपील.

परंतु, पुरेशा कारणामुळे अपीलकर्त्याला वेळीच अपील दाखल करता आले नाही अशी जर अपील अधिकाऱ्याची खात्री पटली तर, त्याला उक्त तीस दिवसांचा कालावधी संपल्यानंतरही अपील विचारार्थ स्वीकारता येईल.

(२) पोटकलम (१) खाली अपील आल्यानंतर, अपील अधिकारी अपीलकर्त्याला आपले म्हणणे मांडण्याची संधी देऊन नंतर, शक्य तितक्या त्वरेने अपीलाचा निकाल करील.

## प्रकरण ५ वे

### कंत्राटी कामगारांचे कल्याण व आरोग्य

आहारगृहे. **१६.** (१) (क्) ज्या आस्थापनेला हा अधिनियम लागू होतो,

(ख्) जेथे कंत्राटी कामगार कामाला लावण्याची आवश्यकता असणारे काम विहित करण्यात येईल अशा कालावधीपर्यंत चालू रहाणे संभाव्य आहे, आणि

(ग्) जेथे कंत्राटदारामार्फत सर्वसाधारणपणे शंभर किंवा त्याहून अधिक कंत्राटी कामगार कामाला लावले जातात,

अशा प्रत्येक आस्थापनेमध्ये, अशा कंत्राटी कामगारांच्या उपयोगासाठी कंत्राटदाराने एका किंवा अधिक आहारगृहांची व्यवस्था करून ती चालवावी असे आवश्यक करणारे नियम समुचित शासनाला करता येतील.

(२) पूर्वगामी शक्तीच्या व्यापकतेला बाध न येता, अशा नियमांद्वारे पुढील गोष्टींबाबत उपबंध करता येतील:—

(क्) कोणत्या दिनांकापर्यंत आहारगृहांची व्यवस्था करावी लागेल ;

(ख्) किती आहारगृहांची व्यवस्था करावी लागेल ती संख्या, आणि आहारगृहांचे बांधकाम, जागा, फर्निचर आणि अन्य साधनसामग्री यांबाबतची मानके; आणि

(ग्) तेथे कोणते अन्नपदार्थ पुरवता येतील आणि त्यासाठी किती पैसे आकारता येतील.

विश्रांतिकक्ष. **१७.** (१) (क्) ज्या आस्थापनेला हा अधिनियम लागू होतो, आणि

(ख्) जेथे कंत्राटी कामगार कामाला लावण्याची आवश्यकता असणारे काम विहित करण्यात येईल अशा कालावधीपर्यंत चालू रहाणे संभाव्य आहे,

त्या आस्थापनेच्या कामाच्या संबंधात कंत्राटी कामगारांना जेथे रात्री मुक्काम करावा लागतो त्या प्रत्येक जागी, कंत्राटी कामगारांच्या उपयोगासाठी विहित करण्यात येईल अशा अवधीत विहित असे विश्रांतिकक्ष किंवा अशी अन्य अनुरूप पर्यायी जागा यांची सोय कंत्राटदाराकडून केली जाईल व ती सुस्थितीत ठेवली जाईल.

(२) पोटकलम (१) खाली पुरवावयाच्या विश्रांतिकक्षांमध्ये किंवा पर्यायी जागेमध्ये पुरेसा प्रकाश व खेळती हवा असेल आणि ती जागा स्वच्छ व आरामप्रद स्थितीमध्ये ठेवली जाईल.

अन्य सुविधा. **१८.** ज्या आस्थापनेला हा अधिनियम लागू होतो त्या आस्थापनेच्या कामाच्या संबंधात कंत्राटी कामगार कामाला लावण्याऱ्या प्रत्येक कंत्राटदाराने,—

(क्) कंत्राटी कामगारांसाठी सोयीस्कर ठिकाणी आरोग्यप्रद अशा पिण्याच्या पाण्याचा पुरेसा साठा ;

(ख्) आस्थापनेतील कंत्राटी कामगारांना सोयीस्कर होईल व चटकन जाता येईल अशा ठिकाणी विहित प्रकारचे पुरेसे शौचकूप व मुताऱ्या ; आणि

(ग्) धुण्याच्या सोयी,

उपलब्ध करून त्या सुस्थितीत राखणे हे त्याचे कर्तव्य असेल.

प्रथमोपचाराच्या सुविधा. **१९.** जेथे कंत्राटदाराने कंत्राटी कामगार कामाला लावलेले आहेत त्या प्रत्येक ठिकाणी त्याच्याकडून विहित साधनसामग्रीने सुसज्ज असलेली प्रथमोपचाराची पेटी कामाच्या सर्व वेळांमध्ये चटकन उपलब्ध होऊ शकेल अशाप्रकारे पुरवली जाईल व सुस्थितीत ठेवली जाईल.

विवक्षित बाबतीत मुख्य नियोक्त्याचे दायित्व. **२०.** (१) आस्थापनेमध्ये कामाला लावलेल्या कंत्राटी कामगारांच्या लाभासाठी कलम १६, कलम १७, कलम १८ किंवा कलम १९ यांखाली पुरवणे आवश्यक असलेली कोणतीही सुखसोय जर त्यासाठी विहित केलेल्या कालावधीच्या आत कंत्राटदाराने केली नाही तर, अशी सुखसोय विहित करण्यात येईल अशा कालावधीमध्ये मुख्य नियोक्त्याकडून उपलब्ध करून दिली जाईल.

(२) ती सुखसोय उपलब्ध करताना मुख्य नियोक्त्याला आलेला सर्व खर्च मुख्य नियोक्ता कोणत्याही संविदेअन्वये कंत्राटदाराला देणे असलेल्या कोणत्याही रकमेमधून वळता करून किंवा कंत्राटदाराकडून येणे असलेले ऋण म्हणून कंत्राटदाराकडून वसूल करू शकेल.

वेतन देण्याची जबाबदारी. **२१.** (१) कंत्राटदार हा, त्याने कंत्राटी कामगार म्हणून कामाला लावलेल्या प्रत्येक कामगाराला वेतन देण्यास जबाबदार असेल आणि असे वेतन, विहित करण्यात येईल अशा कालावधी संपण्यापूर्वी दिले जाईल.

(२) प्रत्येक मुख्य नियोक्ता, त्याने योग्य रीतीने प्राधिकृत केलेला एक प्रतिनिधी कंत्राटदारांकडून वेतनाचे संवितरण करण्यात येणार त्यावेळी उपस्थित राहण्यासाठी म्हणून नामनिर्दिष्ट करील आणि वेतन म्हणून दिली जाणारी रक्कम, विहित करण्यात येईल त्या रीतीने प्रमाणित करून कळवणे हे अशा प्रतिनिधीचे कर्तव्य असेल.

(३) वेतनाचे संवितरण मुख्य नियोक्त्याच्या प्राधिकृत प्रतिनिधीच्या समक्ष होईल याची निश्चिती करणे हे कंत्राटदाराचे कर्तव्य असेल.

(४) जर कंत्राटदार विहित कालावधीमध्ये वेतन देण्यास चुकला किंवा त्याने ते कमी प्रमाणात दिले तर, कंत्राटदाराने कामाला लावलेल्या कंत्राटी कामगारांना संपूर्ण, किंवा, प्रकरणपरत्वे, देण्याचे बाकी राहिलेले असे देय वेतन देण्यास मुख्य नियोक्ता दायी असेल आणि अशी दिलेली रक्कम कोणत्याही संविदेअन्वये कंत्राटदाराला देणे असलेल्या रकमेमधून वळती करून किंवा कंत्राटदाराकडून येणे असलेले ऋण म्हणून तो कंत्राटदाराकडून वसूल करील.

## प्रकरण ६ वे

### दंड आणि प्रक्रिया

२२. (१) जो कोणी एखाद्या निरीक्षकाला तो या अधिनियमाखाली आपली कर्तव्ये पार पाडीत असताना अटकाव करील अथवा ज्यांना हा अधिनियम लागू होतो ती आस्थापना किंवा तो कंत्राटदार यांच्या संबंधात या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली प्राधिकृत केलेले कोणतेही निरीक्षण, तपासणी, चौकशी किंवा बारीक चौकशी करण्यासाठी त्या निरीक्षकाला कोणतीही वाजवी सुविधा उपलब्ध करून देण्यास नकार देईल किंवा त्याकामी बुद्धिपुरस्सर उपेक्षा करील तो, तीन महिनेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल. अटकाव.

(२) जो कोणी या अधिनियमानुसार ठेवलेली कोणतीही नोंदवही किंवा अन्य दस्तऐवज, निरीक्षकाने मागणी केली असता हजर करण्यास बुद्धिपुरस्सर नकार देईल अथवा निरीक्षक या अधिनियमाखालील आपल्या कर्तव्यांच्या अनुरोधाने कृती करीत असताना त्याच्यापुढे हजर होण्यास किंवा त्याच्याकडून तपासणी केली जाण्यास प्रतिबंध करील किंवा प्रतिबंध करण्याचा प्रयत्न करील किंवा ज्यामुळे तसा प्रतिबंध होणे संभवनीय आहे असे समजण्यास त्याला कारण असेल असे काहीही करील तो, तीन महिनेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.

२३. जो कोणी या अधिनियमांपैकी किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमांपैकी कंत्राटी कामगारांना कामावर लावण्यास मनाई करणाऱ्या, त्यावर निर्बंध घालणाऱ्या किंवा त्याचे विनियमन करणाऱ्या कोणत्याही उपबंधांचे व्यतिक्रमण करील किंवा या अधिनियमाखाली मंजूर केलेल्या कोणत्याही लायसनाच्या शर्तींचे व्यतिक्रमण करील तो, तीन महिनेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस, आणि व्यतिक्रमण चालू राहिल्यास त्याबाबतीत, अशा पहिल्या व्यतिक्रमणाबद्दलच्या दोषसिद्धीनंतर असे व्यतिक्रमण चालू राहील त्या प्रत्येक दिवसाकाठी शंभर रुपयांपर्यंत असू शकेल अशा जास्तीच्या द्रव्यदंडास पात्र होईल. कंत्राटी कामगारांना कामाला लावण्या-संबंधीच्या उपबंधांचे व्यतिक्रमण.

२४. जर कोणत्याही व्यक्तीने या अधिनियमातील किंवा त्याखाली केलेल्या नियमांतील उपबंधांपैकी कोणत्याही उपबंधाचे व्यतिक्रमण केले असून त्याबद्दल इतरत्र अन्य कोणताही दंड उपबंधित केला नसेल तर, ती तीन महिनेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल. अन्य गुन्हे.

२५. (१) या अधिनियमाखालील गुन्हा करणारी व्यक्ती ही कंपनी असल्यास, कंपनी, तसेच गुन्हा घडतेवेळी कंपनीच्या कामकाज-चालनाबद्दल कंपनीची प्रभारी असलेली व त्यासाठी कंपनीला जबाबदार असलेली प्रत्येक व्यक्तीही गुन्ह्याबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि आणि त्यांच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व तद्नुसार शिक्षा मिळण्यास त्या पात्र असतील : कंपन्यांनी केलेले गुन्हे.

परंतु असा गुन्हा आपल्या नकळत घडला किंवा तो घडू नये म्हणून आपण सर्व प्रकारे यथायोग्य तत्परता दाखवली होती असे जर अशा कोणत्याही व्यक्तीने शाबीत केले तर, या पोटकलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे ती व्यक्ती कोणत्याही शिक्षेस पात्र होणार नाही.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा या अधिनियमाखालील गुन्हा एखाद्या कंपनीने केलेला असेल आणि कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, व्यवस्थापन एजंट किंवा अन्य कोणताही अधिकारी याच्या संमतीने किंवा मूकानुमतीने तो गुन्हा घडलेला आहे किंवा गुन्हा घडण्याचा कारणसंबंध त्याच्याकडून झालेल्या कोणत्याही हलगर्जीपणाशी जोडता येण्यासारखा आहे असे शाबीत करण्यात आले तर, असा संचालक, व्यवस्थापक, व्यवस्थापन एजंट किंवा अन्य कोणताही अधिकारी हादेखील त्या गुन्ह्याबद्दल दोषी असल्याचे मानले जाईल आणि त्याच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व तद्नुसार शिक्षा मिळण्यास तो पात्र राहील.

**स्पष्टीकरण :**—या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(क) "कंपनी" याचा अर्थ कोणताही निगम-निकाय असा आहे व त्यात पेढी आणि अन्य व्यक्तिसंघ यांचा समावेश होतो; आणि

(ख) "संचालक" याचा पेढीच्या संबंधातील अर्थ, पेढीतील भागीदार असा आहे.

२६. कोणतेही न्यायालय या अधिनियमाखालील कोणत्याही गुन्ह्याबाबत मुख्य निरीक्षकाकडून किंवा त्याच्या लेखी पूर्वपरवानगीने तक्रार करण्यात आल्याखेरीज त्याची दखल घेणार नाही आणि इलाखा शहर दंडाधिकारी किंवा प्रथम वर्ग दंडाधिकारी यांच्या न्यायालयाहून कनिष्ठ दर्जा असलेले कोणतेही न्यायालय या अधिनियमाखाली शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही गुन्ह्याची संपरीक्षा करणार नाही. गुन्ह्यांची दखल घेणे.

२७. या अधिनियमाखाली शिक्षापात्र असलेल्या गुन्ह्याबाबत, अभिकथित गुन्हा घडल्याचे निरीक्षकाला कळल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत त्यासंबंधी तक्रार केलेली आहे असे झाल्याशिवाय कोणतेही न्यायालय दखल घेणार नाही : अभियोगांची मुदत.

परंतु निरीक्षकाने दिलेल्या लेखी आदेशाची अवज्ञा अशा स्वरूपाचा गुन्हा घडलेला असेल तेथे, तो गुन्हा ज्या दिनांकास घडला असल्याचे अभिकथित करण्यात आले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत त्याबाबतची तक्रार करता येईल.

## प्रकरण ७ वे

### संकीर्ण

निरीक्षणकार्य करणारा कर्मचारीवर्ग.

२८. (१) **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे समुचित शासन आपणांस या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ निरीक्षक म्हणून योग्य वाटतील अशा व्यक्ती नियुक्त करू शकेल आणि या अधिनियमाखालील त्यांच्या शक्ती त्यांना कोणत्या स्थानिक सीमांमध्ये वापराव्या लागतील ते निश्चित करू शकेल.

(२) याबाबतीत केलेल्या कोणत्याही नियमांच्या अधीनतेने, निरीक्षक ज्या स्थानिक सीमांमध्ये त्याला नियुक्त केलेले आहे त्या सीमांमध्ये,—

(क) जेथे कंत्राटी कामगार कामाला लावलेले आहेत अशा कोणत्याही वास्तूमध्ये किंवा जागी हा अधिनियम किंवा त्याखाली केलेले नियम यांच्याद्वारे किंवा त्याखाली जी नोंदवही किंवा अभिलेख किंवा नोटिसा ठेवणे किंवा प्रदर्शित करणे आवश्यक केलेले आहे त्यांची तपासणी करण्याच्या प्रयोजनार्थ शासनाच्या किंवा कोणत्याही स्थानिक किंवा अन्य आशासकीय प्राधिकरणाच्या सेवेत असणाऱ्या व्यक्तींचे आपणांस योग्य वाटेल तशा प्रकारचे साहाय्य (मिळाल्यास) घेऊन, सर्व वाजवी वेळी प्रवेश करू शकेल आणि निरीक्षणासाठी ती सादर करण्यास फर्मावू शकेल;

(ख) अशा कोणत्याही वास्तूमध्ये किंवा जागी जी व्यक्ती त्याला आढळेल आणि जी तेथे कामाला लावलेला कामगार आहे असे समजण्यास त्याला वाजवी कारण असेल अशा कोणत्याही व्यक्तीची तपासणी करू शकेल;

(ग) बाहेरून करून आणण्यासाठी काम देणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस आणि कोणत्याही कामगारास, ज्यांना, ज्यांच्याकरता आणि ज्यांच्याकडून काम बाहेर दिले गेलेले आहे किंवा ते स्वीकारले गेले आहे त्या व्यक्तींची नावे आणि पत्ते यांच्याबाबत आणि त्या कामासाठी द्यावयाच्या मजुरीच्या बाबत तो यथाशक्ति जी कोणतीही माहिती देऊ शकतो ती देण्यास फर्मावू शकेल;

(घ) या अधिनियमाखालील जो गुन्हा मुख्य नियोक्त्याने किंवा कंत्राटदाराने केलेला आहे असे समजण्यास आपणांस वाजवी कारण असेल त्याच्या बाबत स्वतःला संबद्ध वाटेल अशी नोंदवही, वेतनाचा अभिलेख किंवा नोटिसा किंवा त्यांचे भाग सक्तीने ताब्यात घेऊ शकेल किंवा त्यांच्या नकला घेऊ शकेल; आणि

(ङ) विहित करण्यात येतील अशा अन्य शक्ती वापरू शकेल.

(३) पोटकलम (२) खाली निरीक्षकाने ज्या कोणत्याही व्यक्तीला एखादा दस्तऐवज किंवा वस्तू हजर करण्यास किंवा कोणतीही माहिती देण्यास फर्मावले असेल ती व्यक्ती तसे करण्यास 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५)—कलम १७५ व कलम १७६ यांच्या अर्थानुसार विधितः बद्ध असल्याचे मानण्यात येईल.

(४) 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८' (१८९८ चा ५) याचे उपबंध उक्त संहितेच्या कलम ९८ खाली काढलेल्या अधिपत्राच्या प्राधिकाराअन्वये केलेल्या कोणत्याही झडतीस किंवा अभिग्रहणास जसे लागू होतात तसे ते, होईल तेथवर, पोटकलम (२) खालील कोणत्याही झडतीस किंवा अभिग्रहणास लागू होतील.

नोंदवह्या आणि अन्य अभिलेख ठेवावयाचे.

२९. (१) प्रत्येक मुख्य नियोक्ता आणि प्रत्येक कंत्राटदार हा कामाला लावलेले कंत्राटी कामगार, कंत्राटी कामगारांकडून केल्या जाणाऱ्या कामाचे स्वरूप, कंत्राटी कामगारांना दिल्या जाणाऱ्या वेतनाचे दर यांबाबत विहित असेल असा तपशील व विहित असा अन्य तपशील देणाऱ्या नोंदवह्या व अभिलेख विहित अशा नमुन्यात ठेवील.

(२) जेथे कंत्राटी कामगार कामाला लावलेले आहेत त्या आस्थापनेच्या वास्तूमध्ये प्रत्येक मुख्य नियोक्ता आणि प्रत्येक कंत्राटदार हा कामाचे तास व कामाच्या पाळीचे स्वरूप यांचा तपशील आणि विहित करण्यात येईल अशी अन्य माहिती अंतर्भूत असणाऱ्या विहित नमुन्यातील नोटिसा प्रदर्शित करील.

या अधिनियमाशी विसंगत असलेल्या कायद्यांची व करारांची परिणामकता.

३०. (१) या अधिनियमाचे उपबंध हे, आस्थापनेला लागू असणाऱ्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये अथवा कोणत्याही कराराच्या किंवा सेवा-संविदेच्या अटींमध्ये किंवा कोणत्याही स्थायी आदेशामध्ये—मग ते या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी केलेले असोत किंवा नंतर केलेले असोत—त्या उपबंधांशी विसंगत असे काहीही अंतर्भूत असले तरी परिणामक होतील :

परंतु कोणत्याही बाबीसंबंधी आस्थापनेमध्ये कामाला लावलेल्या कंत्राटी कामगारांना, या अधिनियमाखाली ज्या लाभांवर हक्क प्राप्त झाला असता त्यांहून जे त्यांना अधिक अनुकूल आहेत अशा लाभांना ते कामगार असा कोणताही करार किंवा सेवा-संविदा किंवा स्थायी आदेश यांखाली हक्कदार असले तर, इतर बाबतीत त्यांना या अधिनियमाखाली लाभ मिळत असले तरी, तेवढ्या बाबीपुरते त्यांना अधिक अनुकूल लाभ मिळण्याचे चालू राहील.

(२) कोणताही कंत्राटी कामगार एखाद्या बाबतीत या अधिनियमाखाली जे अधिकार किंवा सवलती मिळण्यास हक्कदार होऊ शकेल त्यापेक्षा जे त्याला अधिक अनुकूल आहेत असे अधिकार किंवा सवलती आपणांस देण्याविषयी मुख्य नियोक्त्याशी किंवा, प्रकरणपरत्वे, कंत्राटदाराशी करार करण्यास त्या कामगाराला या अधिनियमातील काहीही प्रतिबंधक आहे असा त्याचा अर्थ लावला जाणार नाही.

**विशेष प्रकरणात सूट देण्याची शक्ती.**

३१. समुचित शासनाला आणीबाणीच्या परिस्थितीत **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे असे निदेशित करता येईल की, अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे काही शर्ती व निर्बंध असल्यास त्यांच्या अधीनतेने आणि अशा विनिर्दिष्ट कालावधीपुरते किंवा कालावधींपुरते या अधिनियमाचे सर्व किंवा कोणतेही उपबंध किंवा त्याखाली केलेले नियम कोणत्याही आस्थापनेला किंवा आस्थापनावर्गाला किंवा कोणत्याही कंत्राटदार वर्गाला लागू होणार नाहीत.

**या अधिनियमाखाली केलेल्या कारवाईस संरक्षण.**

३२. (१) हा अधिनियम किंवा त्याखाली केलेला कोणताही नियम किंवा काढलेला कोणताही आदेश यानुसार सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल कोणताही नोंदणी अधिकारी, लायसन अधिकारी किंवा अन्य कोणताही शासकीय कर्मचारी यांच्याविरुद्ध अथवा केंद्रीय मंडळाच्या किंवा, प्रकरणपरत्वे, राज्य मंडळाच्या कोणत्याही सदस्याविरुद्ध कोणताही दावा, अभियोग किंवा अन्य वैध कार्यवाही होऊ शकणार नाही.

(२) हा अधिनियम अथवा त्याखाली केलेला कोणताही नियम किंवा काढलेला कोणताही आदेश याच्या अनुरोधाने सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे झालेल्या किंवा होणे संभाव्य असलेल्या नुकसानाबद्दल शासनाविरुद्ध कोणताही दावा किंवा अन्य वैध कार्यवाही होऊ शकणार नाही.

**निदेश देण्याची शक्ती.**

३३. केंद्र शासन या अधिनियमामध्ये अंतर्भूत असलेल्या उपबंधांची अंमलबजावणी करण्याच्या बाबतीत कोणत्याही राज्याच्या शासनाला निदेश देऊ शकेल.

**अडचणी निवारण करण्याची शक्ती.**

३४. या अधिनियमाच्या उपबंधांची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्भवल्यास केंद्र शासनाला ती अडचण दूर करण्यासाठी त्याला आवश्यक किंवा समयोचित वाटेल त्याप्रमाणे, **शासकीय राजपत्रात** आदेश प्रकाशित करून त्याद्वारे या अधिनियमाच्या उपबंधांशी विसंगत नसलेले असे उपबंध करता येतील.

**नियम करण्याची शक्ती.**

३५. (१) समुचित शासनाला या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी पूर्वप्रकाशनाच्या शर्तीच्या अधीनतेने नियम करता येतील.

(२) विशेषत: आणि पूर्वगामी शक्तीच्या व्यापकतेला बाध न येता, अशा नियमांद्वारे पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही बाबींसाठी उपबंध करता येईल, त्या अशा :—

(क्) केंद्रीय मंडळावर किंवा राज्य मंडळावर निरनिराळ्या हितसंबंधितांचे प्रतिनिधित्व करणारे सदस्य म्हणून नियुक्त करावयाच्या व्यक्तींची संख्या, त्यांचा पदावधी आणि अन्य सेवा-शर्ती, त्यांची कार्ये पार पाडताना त्यांनी अनुसरावयाची कार्यपद्धती आणि रिक्त पदे भरण्याची रीत ;

(ख्) या अधिनियमाखाली घटित केलेल्या कोणत्याही समितीच्या सभांच्या वेळा व स्थळे, अशा सभांचे कामकाज चालवण्यासाठी आवश्यक असलेल्या गणसंख्येसुद्धा त्या सभांमध्ये अनुसरावयाची कार्यपद्धती, आणि समितीच्या सदस्यांना देण्यात येतील त्या फीच्या रकमा व भत्ते ;

(ग्) कलम ७ खाली जशा रीतीने आस्थापनांची नोंदणी करता येईल ती रीत, त्यासाठी आकारावयाची फी आणि नोंदणी प्रमाणपत्राचा नमुना ;

(घ्) कलम १३ खाली लायसनाच्या मंजुरीसाठी किंवा नवीकरणासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना आणि त्यात अंतर्भूत असेल तो तपशील ;

(ङ्) लायसनाच्या मंजुरीसाठी आलेल्या अर्जाबाबत बारकाईने चौकशी कशी करावयाची ती रीत आणि लायसन मंजूर करताना किंवा नाकारताना विचारात घ्यावयाच्या बाबी ;

(च्) कलम १२ खाली मंजर करता येईल किंवा नवीकरण करता येईल त्या लायसनाचा नमुना आणि ज्यांच्या अधीनतेने लायसन मंजूर करता येईल किंवा त्याचे नवीकरण करता येईल त्या शर्ती, लायसनाच्या मंजुरीसाठी किंवा नवीकरणासाठी आकारावयाची फी आणि अशा शर्तींचे पालन होण्याबद्दल प्रतिभती म्हणून अनामत ठेवावयाची कोणतीही रक्कम ;

(छ्) कोणत्या परिस्थितीत कलम १४ खाली लायसनांमध्ये बदल करता येईल किंवा विशोधन करता येईल ;

(ज्) कलम १५ खाली कशा स्वरूपात व कशा रीतीने अपीले दाखल करता येतील ते आणि अपीलाचा निकाल करताना अपील अधिकाऱ्यांनी अनुसरावयाची कार्यपद्धती;

(झ्) ज्या सुविधा पुरवणे व सज्ज ठेवणे या अधिनियमाअन्वये आवश्यक केले आहे त्या सुविधा कंत्राटदाराने आणि कंत्राटदाराने कसूर केल्यास मुख्य नियोक्त्याने किती मुदतीत पुरवाव्यात व सज्ज ठेवाव्यात;

(ञ्) किती व कोणत्या प्रकारची आहारगृहे, विश्रांतिकक्ष, शौचकूप व मुताऱ्या उपलब्ध करून सुस्थितीत ठेवली जावीत ;

(ट्) प्रथमोपचार पेटीमध्ये कोणत्या प्रकारची साधनसामुग्री पुरवली जावी ;

(ठ्) कंत्राटी कामगारांना प्रदेय असणारे वेतन कलम ३१-पोट कलम (१) खाली कंत्राटदाराकडून किती कालावधीत दिले जावे ;

(ड्) मुख्य नियोक्ते व कंत्राटदार यांनी नोंदवह्या व अभिलेख कोणत्या नमुन्यात ठेवावयाचे;

(ढ्) प्रतिवेदने सादर करणे, अशी प्रतिवेदने कोणत्या नमुन्यात व कोणत्या प्राधिकरणांकडे सादर करता येतील ;

(ण्) कंत्राटी कामगारांच्या संबंधातील कोणतीही माहिती किंवा आकडेवारी गोळा करणे ; आणि

(त्) या अधिनियमाखाली विहित करावयाची किंवा करता येईल अशी अन्य कोणतीही बाब.

(३) या कलमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहापुढे, ते एका सत्राने किंवा दोन क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीमध्ये सत्रासीन असताना ठेवला जाईल ; आणि ज्या सत्रात तो याप्रमाणे ठेवला गेला ते किंवा त्याच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, तो नियम त्यानंतर अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल किंवा, प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही; तथापि अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

---

## THE CONTRACT LABOUR (REGULATION AND ABOLITION) ACT, 1970

## कंत्राटी कामगारसेवा (विनियमन व उच्चाटन) अधिनियम, १९७०

### इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| abolition .. .. | उच्चाटन .. | [Short title] |
| Central Advisory Contract Labour Board | कंत्राटी कामगारसेवाविषयक केंद्रीय मंडळ | [s. 3(*1*)] |
| contract labour .. | १. कंत्राटी कामगार सेवा .. | [Short title] |
| | २. कंत्राटी कामगार .. | [s. 2(*1*)(b)] |
| contractor .. | कंत्राटदार .. | [s. 2(*1*)(c)] |
| controlled industry .. | नियंत्रित उद्योगधंदा .. | [s. 2(*1*)(d)] |
| establishment .. | आस्थापना .. | [s. 2(*1*)(e)] |
| goods or articles of manufacture .. | माल किंवा बनवलेल्या वस्तू .. | [s. 2(*1*)(c)] |
| intermittent or casual .. | अधूनमधून किंवा निमित्तवशात् करावे लागणारे | [s. 1(*5*)(a)] |
| principal employer .. | मुख्य नियोक्ता .. | [s. 2(*1*)(g)] |
| produce a given result .. | ठराविक फलनिष्पत्ती करणे .. | [s. 2(*1*)(c)] |
| State Advisory Contract Labour Board. | कंत्राटी कामगारसेवाविषयक राज्य मंडळ | [s. 4(*1*)] |
| workman .. | कामगार .. | [s. 2(*1*)(i)] |

---

## कंत्राटी कामगारसेवा (विनियमन व उच्चाटन) अधिनियम, १९७०

## THE CONTRACT LABOUR (REGULATION AND ABOLITION) ACT, 1970

### मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अधूनमधून किंवा निमित्तवशात् करावे लागणारे .. | intermittent or casual .. | [s. 1(*5*)(a)] |
| आस्थापना .. | establishment .. | [s. 2(*1*)(e)] |
| उच्चाटन .. | abolition .. | [Short title] |
| कंत्राटदार .. | contractor .. | [s. 2(*1*)(c)] |
| कंत्राटी कामगार .. | contract labour .. | [s. 2(*1*)(b)] |
| कंत्राटी कामगारसेवा .. | contract labour .. | [Short title] |
| कंत्राटी कामगारसेवाविषयक केंद्रीय मंडळ .. | Central Advisory Contract Labour Board | [s. 3(*1*)] |
| कंत्राटी कामगारसेवाविषयक राज्य मंडळ .. | State Advisory Contract Labour Board | [s. 4(*1*)] |
| कामगार .. | workman .. | [s. 2(*1*)(i)] |
| ठराविक फलनिष्पत्ती करणे .. | produce a given result .. | [s. 2(*1*)(c)] |
| नियंत्रित उद्योगधंदा .. | controlled industry .. | [s. 2(*1*)(d)] |
| माल किंवा बनवलेल्या वस्तू .. | goods or articles of manufacture | [s. 2(*1*)(c)] |
| मुख्य नियोक्ता .. | principal employer .. | [s. 2(*1*)(g)] |

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई